# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

# कृषी विद्यान संकुल, काष्टी

**KVS NEWS**

## कृषी विज्ञान संकुल काष्टी मालेगाव प्रक्षेत्रावर नामदार दादाजी भुसे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न

---

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत सन 2020-21 मध्ये मा. ना. दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून नव्याने सुरू झालेल्या कृषी विज्ञान संकुल काष्टी मालेगाव येथे सध्या पाच कृषी व संलग्न महाविद्यालये व एक कृषी तंत्रनिकेतन सुरू आहे. कृषी विज्ञान संकुलासाठी शासनाकडून 622 एकर जमीन विद्यापीठाला हस्तांतरित करण्यात आलेली आहे. सध्या त्या प्रक्षेत्रावर काष्टी येथे दोन महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. कृषी विज्ञान संकुल प्रक्षेत्र सुशोभीकरणासाठी दिनांक 7 जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे बंदरे विकास व खनिकर्म मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण आणि वनोमहोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये प्रवेशद्वार व संकुल इमारत रस्त्याच्या दुतर्फा ५०० वृक्षांची लागवड केली. या कार्यक्रमाप्रसंगी नामदार भुसे यांनी मनोगत व्यक्त करताना कृषी विज्ञान संकुल काष्टी येथील सर्व विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे निसर्गाचं संवर्धन करावे व कृषी विज्ञान संकुलातील कृती पर्यावरण पूरक असाव्या असे नमूद केले. कृषी विज्ञान संकुलाचे नाव राज्यातच नव्हे तर देशात एका विशिष्ट्य उंचीवर घेऊन जावे. यासाठी येथील विद्यार्थी घडवितांना शिस्तप्रिय घडावा व संकुलाचा विद्यार्थी म्हणून त्याचा नामउल्लेख व्हावा अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. पी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. एस. पी. सोनवणे यानी या कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी उपविभागीय कृषी अधिकारी मालेगाव श्री.गोकुळ अहिरे, तहसिलदार श्री. नितीन देवरे, तालुका कृषी अधिकारी श्री.ज्ञानदेव शिंदे, तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अभियंता श्री. मिलींद ढोके, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रा. विवेक कानवडे कृषी महाविद्यालय काष्टी चे सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ. संजय पाटील, उद्यान विद्या महाविद्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ. दिनेश बिरारी, सहाय्यक कुलसचिव श्री रवींद्र खैरनार तसेच कृषी विज्ञान संकुलातील सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

# कृषी विद्यान संकुल, काष्टी

**KVS NEWS**




